# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२-२२६११०१५

MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai - 400 001
Website: www.msbnpe.org E-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- ०२२-२२६११०१५


---

क्र. मराशुवपशिमं/मुदतवाढ/९६४३ /२०२५ दि. ३० /४ /२०२५

प्रति,
प्राचार्य/संस्था प्रमुख,
सर्व संलग्नता प्राप्त ए.एन.एम./जी.एन.एम. परिचर्या संस्था,
महाराष्ट्र राज्य

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता ए.एन.एम व जी.एन.एम. अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे मंडळामार्फत **मुळ प्रमाणपत्रांची पडताळणी करणेकरीता अंतिम मुदतवाढ व त्रुटी पुर्तता करणेबाबत.**

संदर्भ :- १. क्र. मराशुवपशिमं/१९०९२/२०२४, दि. १९/१२/२०२४
२. क्र. मराशुवपशिमं/१३३४/२०२५, दि. २५/०३/२०२५

सर्व संलग्नता प्राप्त ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्था यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम क्र. २३ सन २०१३ नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ए.एन.एम व जी.एन.एम. अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे मुळ प्रमाणपत्र पडताळणी करण्याकरीता संदर्भ क्र. १ व संदर्भ क्र. २ नुसार मंडळाच्या कार्यालयात विद्यार्थ्यांच्या संपुर्ण मुळ प्रमाणपत्रांसहित व संस्थेच्या नमुद केलेल्या कागदपत्रांसहित उपस्थित राहाण्याकरीता परिपत्रक काढण्यात आले होते.

परंतु अद्यापपर्यंत ज्या संस्थानी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ए.एन.एम व जी.एन.एम. अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे मुळ प्रमाणपत्र तपासणी करण्यासाठी मंडळाच्या कार्यालयात उपस्थित झालेल्या नाही, तरी अशा संस्थांनी सदर परिपत्रकानुसार **दिनांक १५ मे २०२५ पर्यंत** मंडळाच्या कार्यालयात उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या मुळ प्रमाणपत्र तपासणी करावी, तसेच ज्या संस्थांनी मुळ प्रमाणपत्र तपासणी करुन त्रुटींची पुर्तता केलेली नाही अशा संस्थांनी त्रुटींची पुर्तता करावी.

**सदर मुळ प्रमाणपत्र तपासणी करण्याकरीताची मुदतवाढ १५ मे २०२५ ही अंतिम मुदतवाढ असून विहीत मुदतीत न आल्यास / मुळ प्रमाणपत्र तपासणी न झालेल्या / त्रुटींची पुर्तता न झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता PRN NO. निर्गमित (Genrate) करता येणार नाही. विद्यार्थी परिक्षेस अपात्र ठरल्यास तसेच विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक व शैक्षणिक नुकसानाकरीता व कायदेशीर बाबी उद्भवल्यास सर्वस्वी प्राचार्य / संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावीं.**

**टिप :- संदर्भ क्र. १ व २ च्या परिपत्रकानुसार दंड आकारण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ